# महिला उद्योजकता माध्यमातून महिला सबलीकरण.

**डॉ. साधना डी. वाघाडे**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख
कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय,
पेट्रोल पंप (जवाहरनगर)ता.जि. भंडारा
९४२३६४१४७३
sadhanawaghade@gmail.com

---

***सारांश** :*

*महिला उद्योजक यांचे देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान आहे. प्राथमिक क्षेत्रात रोजंदारीवर मजूरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण पुरूषांच्या प्रमाणापेक्षा जास्त आहे. कारण असंघटीत क्षेत्रात कमी रोजंदारीत महिला काम करतात. तेव्हा महिलांनी शिक्षण व प्रशिक्षण घेवून उद्योजक क्षेत्राकडे वळून कुटूंबाचा पर्यायाने देशाचा विकास करुन त्यातून महिलांचे सबलीकरण झाले आहे. आजच्या परिस्थितीत सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. तेव्हा महिलांनी स्वत: उद्योग क्षेत्रात पदार्पण केले आहे. त्यातून कुटूंबाचा विकास झाला. वर्तमान काळात बाहेरील खाद्यपदार्थ विकत घेऊन खाण्याकडे जास्त कल आहे. तेव्हा बाजारात लोकांनी आवश्यक असणाऱ्या खाद्यपदार्थांचे उत्पादन विक्री व वितरण या क्षेत्रात महिला उद्योजक बनल्या. चांगले खाद्यपदार्थ पुरविल्यामुळे लोकांचे आरोग्य सांभाळणारे खाद्यपदार्थ पुरवितात अशी लोकांना खात्री होते. खेळणी, रूखवंत, कापड उद्योग, तयार कपडे विकणे, संगणक, गणपतीच्या मूर्ती बनवून विकणे, कार सजावटीचे कौशल्य, क्रीडा साहित्यांचा व्यवसाय, गृहोद्योग, शैक्षणिक सहली, भाज्यांचा रतीब, संगमरवरात फुललेली शिल्पकला, फुलझाडांची नर्सरी ,मासे निर्यातीचे अनोखे क्षेत्र, नऊवारी साडया शिवणे, फायनांस कंसल्टंट, आरामदायी गाद्यांची निर्मिती, केशरचनेतील कौशल्य, फर्निचर क्षेत्रातील भरारी, इलेक्ट्रॉनिक क्षेत्रातील प्रावीण्य, तबला आणि ढोलकी वादन कौशल्य, कलेची जोपासना, ई. प्रचलीत उद्योगात पुढाकार घेऊन महिलांची उद्योग क्षेत्रात मोठया प्रमाणांत प्रगती झाली आहे. कारण महिलांचे संघटन कौशल्य, प्रशासनकौशल्य, जिद्द, चिकाटी, शारीरिक, मानसिक श्रम करण्याची तयारी, नवीन तंत्रज्ञान शिकण्याची जिज्ञासा, यासारख्या विविध गुणांनी युक्त असल्यामुळेच महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर राऊन महिला उद्योजकता व व्यावसायीक कौशल्यात वाढ होत आहे.*

---

**बीजशब्द :** महिला ,उद्योजक, सक्षमीकरण, सबलीकरण, विकास

**प्रस्तावना :**

काही महिलांनी समाजाच्या बदलत्या जीवनशैलीनुसार, निर्माण झालेल्या गरजानुसार व्यवसाय सुरू केले आहे. तर काही महिलांनी स्वत:च्या उपजत कलांचा विकास करून घेतलाय, तर काहींनी अगदी वेगळयाच स्वरूचाचे व्यवसाय सुरू करून यश मिळवलय. तर काही महिलांनी इलेक्ट्रॉनिक वस्तूंची उत्पादने, फर्निचरचे उत्पादन, मासे निर्यात, फायनन्स कंसल्टंट, वाईन मेकर, टेस्टर, क्रीडा साहित्याची विक्री, कार सजावट इ. पुरूषांच्या समजल्या जाणाऱ्या क्षेत्रात प्रवेश करुन '' **हम भी कुछ कम नही**'' हे सिद्ध केले. अशा या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातल्या वादळवाऱ्याची तमा न बाळगता आत्मविश्वासाने तेवणाऱ्या पणत्या आहेत. या पणत्यांच्या सहाय्याने समाजातील अनेक पणत्या लावून सारे आसमत उजळून टाकले. मॅनेजमेंट गुरू पीटर

यांनी अमेरीकेतील एका भाषणांत आदर्श व्यवस्थापक कोणाला मानावे ? तर भारतीय गृहिणीला असा उल्लेख करुन भारतीय गृहिणीला एक प्रकारे गौरविण्यात आले. त्यांनी भारतीय कुटूंब व्यवस्था, त्यामधील स्त्रीचे स्थान, तीचे कामाचे स्वरुप, अशिक्षितपणा, मेहनतीवृती, लहरी पती, हट्टी मुले दारिद्रय, काटकसरीपणा इ. सर्वांचा बारकाईने अभ्यास केला. जवळजवळ सर्वच महिलांना घरातील कामाव्यतिरिक्त वेगळे, काहीतरी करून कलानिर्मितीचा आनंद घ्यावा, स्वत:ची दुसऱ्यांना ओळख करुन द्यावी असे मनोमन वाटत असते.

जागतिकीकरणाच्या या युगात महिलांच्या संदर्भात असणारी **चूल आणि मुल** ही संकल्पना आता कालबध्द झालेली आहे. “ **जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाची उध्दारी** ” तर आता महिलांच्या हातामध्ये आर्थिक विकासाची नाडी दिल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. बचतगट चळवळ ही खऱ्या अर्थाने स्त्री–उद्धाराची, ग्रामविकासाची व देशोन्नतीची चळवळ आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या काळात गरीब, ग्रामिण, कष्टकरी महिलांच्या सहकारातून पुढे आलेली बचत गटाची चळवळ ही गरीब भारतीय समाजाच्या आशेचा किरण ठरत आहे. बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे नेतृत्व उभे आहे. व येणारा काळ हा महिला नेतृत्वाचा आहे.

महिलांनी स्वयंनिर्भर व आत्मनिर्भर, सुदृढ होण्यासाठी त्यांच्यामध्ये असलेले गुण विकसित करणे, त्यांचे कौशल्य हस्तगत करणे म्हणजे स्वत:च्या पायावर उभे राहणे होय. महिला उद्योजक यांचे देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान आहे. महिलांनी शिक्षण व प्रशिक्षण घेवून उद्योजक क्षेत्राकडे वळल्यास त्यांचा कुटुंबाचा पर्यायाने देशाचा विकास झाल्याशिवाय राहणार नाही. आजच्या परिस्थितीत सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत. सध्या लोकांचा कल बाहेरील खाद्य पदार्थ विकत घेऊन खाण्याकडे जास्त आहे. तेव्हा बाजारांत लोकांनी आवश्यक असणाऱ्या खाद्यपदार्थांचे उत्पादन, विक्री व वितरण या क्षेत्रात स्त्रिया उतरल्यांस लोकांचे आरोग्य सांभाळणारे खाद्यपदार्थ त्या पूरवू शकतील. तसेच खेळणी, कापड उद्योग, तयार कपडे ( गारमेंटस ) संगणक यासारखे प्रचलीत उद्योगांत पुढाकार घेवून महिलांनी व्यवसाय केल्यांस महिला उद्योग क्षेत्रात मोठया प्रमाणांत प्रगती करु शकतात. कारण महिलांचे संघटन कौशल्य, प्रशासन कौशल्य, जिद्द, चिकाटी, शारीरिक, मानसिक श्रम करण्याची तयारी, नवीन तंत्रज्ञान शिकण्याची जिज्ञासा, या सारख्या विविध गुणांनीयुक्त असल्यामुळेच महिला प्रत्येक क्षेत्रात अग्रेसर आहेत.

ग्रामीण महिलांना बचतगट, महिलासंघ, याद्वारे कौशल्यविकास प्रशिक्षण दिल्यास ( Skill Develop Training ) उद्योग व सेवा क्षेत्रात सक्षमपणे कार्य करू शकतील. कुशल मनुष्यबळाची गरज आहे. ही काळाची गरज ओळखून महिलांनी त्यांना उपलब्ध शिक्षण व कौशल्यात भर पाडल्यांस देशाच्या उद्योग क्षेत्रात महीलांचा सहभाग वाढू शकतो. महिलांना सर्व कौशल्यासोबत, संवाद कौशल्य, ईंग्रजीचे पुरेसे ज्ञान, संगणकाचे ज्ञान, हाताळण्याचा अनुभव, नवीन तंत्रज्ञान शिकण्याची जिज्ञासा या बाबी असल्यास महिलांचा विकास मोठया प्रमाणांत होवू शकतो.

महिलांनी महिलांकरिता महिलांचे उद्योग चालविल्यास देशातील महिला स्वतंत्र होतील. महिला उद्योजकता निर्माण होण्यासाठी

१) महिलांचे बचतगट तयार करणे.

२) बचतगटांना स्थानिक गांवपातळीवर जावून स्थानिक उपलब्ध सोयीनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण देणे.

३) महिलांना, शिका संघटित व्हा व उद्योग व्यवसाय करा हा मूलमंत्र देवून कमाई करण्याविषयी जनजागृती करणे

४) महिला उद्योगातून तयार होणाऱ्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ व उत्पादन खर्चानुसार बाजारमुल्य मिळवून देणे.

उद्योजकतेमध्ये स्वात्रंत्र्यानंतरसुद्धा स्त्रीयांचा सहभाग कमीच होता. कालांतराने शैक्षणिक प्रगतीमुळे स्त्रीयांची अन्य क्षेत्रात प्रगती होत असतांना स्वतंत्रपणे उद्योजकतेच्या क्षेत्रात स्त्रीयांचा ठसा १९९१ नंतर विशेष करुन दिसायला लागला. उद्योजकतेतून महिला सक्षमीकरण होण्याची संधी प्राप्त होते. काही महिलांनी स्वत:ला अबला समजून घेतले. परंतु नंतर त्यांनी खंबीरपणे अडचणींना तोंड देवून संधीच सोन केलेले आहे. पुरुषांनी उद्योग सोडून दिले पण स्त्रीने त्याच उद्योगांत यश प्राप्त केले.

औद्योगिक विकासासाठी राज्यात तयार करण्यात आलेल्या पोषक वातावरणाचा लाभ महिला उद्योजकांना मिळावा आणि त्यातून महिलांच्या उद्योजकतेला प्रोत्साहन मिळावे यासाठी विशेष धोरण राबविण्याचा निर्णय राज्यशासनाने घेतला आहे. राज्याने लागू केलेल्या अशा प्रकारच्या धोरणाची देशात प्रथमच अंमलबजावणी होत असून या माध्यमातून राज्याने महिलांना नाविन्यपूर्ण संधी उपलब्ध करून दिली आहे.

सामाजिक असमानता, कौटुंबिक हिंसा, अत्याचार, आणि आर्थिक परावलंबित्व यातून स्त्रियांची सुटका करण्यासाठी महिला सक्षमीकरणाची गरज आहे. प्रथम 'आपण सक्षम आहोत' याची खात्री प्रत्येक महिलांनी स्वत:शी बाळगावी. आपल्याला कमी लेखू नये. स्वत:ला कमी समजल्यामुळे आपली सकारात्मक ऊर्जा, उत्साह आणि सामर्थ्य नाश पावते.

**उद्दि टे** :–

१) महिलांना उद्योग करण्याकरिता आर्थिक सहाय्याची गरज.

२) महिलांची व्यावसायीक मानसिकता घडविली पाहिजे.

३) महिलांना उद्योग वाढविण्याकरीता कुटूंबातील व्यक्तिचा सहभाग आवश्यक आहे.

४) उद्योगात महिलांचा सहभाग वाढीसाठी प्रेरणा, आर्थिक पाठबळ व सतत पाठपुरावा करून त्यांचेकडून कार्य करुन घेणे.

५) महिलांमध्ये सकारात्मक दृष्टिकोण निर्माण करणे.

६) उद्योजकतेच्या क्षेत्रात महिला स्वबळावर यशस्वी होत आहे व त्या माध्यमातून होणारे महिला सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.

७) स्थानिक परिस्थितीत महिला उद्योजक उपयोगांत आणत असलेल्या कार्यप्रणालीचा अभ्यास करणे.

८) उद्योजकतेकडे महिलांना आकर्षित करणाऱ्या संधी निर्माण होण्यासाठी उपलब्ध पार्श्वभूमीचा अभ्यास करणे.

९) महिला उद्योजकता व महिला सक्षमीकरण यांच्या परस्परसंबंधाचे विश्लेषणात्मक अध्ययन करणे.

**गृहितकृत्ये** :–

१) महिला उद्योजक ही कल्पक, स्वयंनिर्मित असते.

२) उद्योजकामध्ये स्पर्धा आणि आव्हानांना तोंड देण्याची क्षमता असते.

३) महिला उद्योजक ध्येयनिष्ठित असतात.

४) सध्यास्थितीत महिलांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत आहे.

**उद्योजकांचे गुण व महिला:**– **१)** मेहनती स्वभाव, **२)** संघटन कौशल्य, ३) धडाडी, ४) धोका पत्करण्याची क्षमता, ५) उत्कृष्टतेची आवड, **६)** नाविन्यतेची आवड, ७) दूरदृष्टी, ८) आशावाद,

९) सकारात्मक दृष्टिकोण, **१०)** नेतृत्वकला, ११) चिकाटी, १२) संभाषण चातुर्य, १३) स्वतंत्र निर्णय क्षमता, १४) प्रेरणा.

**महिला उद्योजकांसमोर असणाऱ्या दोन समस्या**

**१ अर्थसहाय्य विषयक समस्या :**

अ) उद्योगातील हिशोबाचे पुरेसे ज्ञान नसणे.
ब) दुय्यम संरक्षणाचा अभाव
क) विक्री विषयक ज्ञानाचा अभाव.
ड) कर्जपुरवठा योजनांच्या माहितीचा अभाव.
इ) कर्जपुरवठयाचा अभाव.

**२ अस्तित्व विषयक समस्या :**

अ) नवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव.
ब) कौशल्यपूर्ण शिक्षणाचा अभाव
क) परिस्थितीला तोंड न देता माघार घेणे.
ड) व्यवसाय विषयक भूमीकेतील बदल.
इ) बॅकेच्या व्यवस्थापणाचा अभाव.
फ) जोखीम स्विकारण्याची अल्पक्षमता.
ज) सकारात्मकतेचा अभाव.
ह) परंपरेने एकत्र येवून काम न करण्याची वृती.

**'स्त्री उद्योजकता व महिला सबलीकरण** :

महिला उद्योजकतेच्या बाबतीत जन्मत:च उद्योगीनी असतात. कारण त्यांच्या घरातील पिढयांपिढया चालणाऱ्या व्यवसायाचे बाळकडू त्यांना मिळालेले असतात. काही महिलांवर उद्योगाची जबाबदारी लादली जाते. ती वडील, पती किंवा भावाच्या आजारपणाने किंवा अकाली निधनामुळे तर काही महिला स्वत: प्रयत्नपूर्वक उद्योजिकतेचे गुण विकसित करतात.

वस्त्रावर पेंटिंग,, काचकाम, मनीकाम, टिकली वर्क करुन रोजगार प्राप्त होते. पुष्परचना करण्यांस शिकविणे, समारंभाच्या प्रसंगी पुष्परचना करुन देणे, फुलांची सजावट करून देणे, पुष्पगुच्छ, हार, गजरे तयार करून देणे फुलांचे दुकान चालविणे, झाडांची नर्सरी तयार करणे कागद, व कापडाची कृत्रिम फुले तयार करून विकणे, ग्रिटींग कार्ड बनविणे, कचऱ्यातून कलेची निर्मिती करणे, प्लॅस्टर ऑफ पॅरीसच्या शोभेच्या वस्तू तयार करुन विकणे, सौदर्य प्रसाधनगृह चालविणे अशा अनेक व्यवसायातून महिला सबलीकरण झाले आहे.

**१) महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सबलीकरण :**

महिलांना समाजात सन्मान प्राप्त होण्यासाठी समाजातील विविध स्तरावरील महिलांना आत्मसम्मान अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासास कारणीभूत होतील असे महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरु झाले आहेत. त्यामुळे महिला आता सर्व समस्यावर मात करुन आपले कौशल्य, आत्मविश्वास आणि उपयोगितेबाबत अग्रेसर आहेत. आपल्या कुटुंबासाठी, इतर महिलांना आणि समाजामध्ये शांतीचे आणि सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधित्व करतात.

**२) शिक्षणाद्वारे महिला सबलीकरण :**

जीवनात प्रगती करण्याचे शिक्षण हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. महिलांची प्रगती आणि सबलीकरणासाठी शिक्षण हे महत्वाचे उदाहरण आहे.

**३) मानसिक सबलीकरण :** महिलांनी आपले मानसिक सबलीकरणकरिता स्वत:मध्ये आत्मविश्वास करणे आवश्यक आहे.

**४) शारीरिक सबलीकरण :**

शासनामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविण्यांत येत आहेत. महिलांना शिक्षित, सक्षम, आणि स्वयंपूर्ण बनविण्याचा या योजनांचा उद्देश आहे.

१) बेटी बचाओ, बेटी पढाओ.
२) महिला आणि बालविकास विभागाच्या योजना.
३) मनोधैर्य योजना
४) माझी कन्या भाग्यश्री
५) जिजाऊ वसतिगृह.
६) अल्पसंख्यांक मुलीसाठी वसतिगृहे
७) सामाजिक न्याय विभागाच्या योजना

**महिला नवीन उद्योजकासाठी भारत सरकारच्या योजना:—**

१) मुद्रा योजना
२) स्टॅंड अप इंडीया, मिशन इंद्रधनुष्य
३) ट्रेड (व्यापार संबंधित उद्योजकता सहाय्यक आणि विकास ) योजना
४) महिला उद्योग निधी योजना
५) अन्नपूर्णा योजना
६) भारतीय महिला व्यवसाय बॅंक कर्ज योजना
७) देना शक्ती योजना
८) उद्योगिनी योजना
९) सेंट कल्याणी योजना

**समारोप :**

२००१ हे महिला सक्षमीकरण /सबलीकरण वर्ष म्हणून घोषित झाले आहे. महिलांच्या सबलीकरणाची गरज वाटू लागली आहे. सक्षमीकरण किंवा सबलीकरण म्हणजे अधिकारात वाढ करणे व अधिकार कसे वापरावे याची जाणीव करुन देणे. अनेक समित्या व आयोग स्त्रियांच्या विकासासाठी त्यांच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी निर्माण झाल्या आहेत. महिलांना स्व अस्तित्वाची जाणीव होऊ लागली आहे. चूल आणि मुल या प्रवृतीला छेद देत आज अनेक क्षेत्र महिलांसाठी खुली झाली आहेत. अनेक क्षेत्र महिलांच्या कामगिरीन उजळून निघाली आहेत. महिलांच्या गरूड भरारीसाठी असंख्य क्षेत्राच खुले आकाश आजच्या महिला तरूणाईला खुणावत आहेत. महिलांवरचे अन्याय, अत्याचार यावर मात करुन भुतकाळासाठी रडण्यापेक्षा वर्तमानकाळाशी लढत व भविष्याच्या शिखरावर चढण्यांत खरा आनंद घेत आहेत. यातूनच महिला उद्योजिकेचे सबलीकरण झाले आहे.

**निष्कर्ष:—**

१. महिलांनी शिक्षण व प्रशिक्षण घेवून कौशल्य विकसित करणे ही काळाची गरज आहे.
२. महिलामध्ये काम करण्याची वृत्ती, जिज्ञासा, चिकाटी जिद्द असल्यामुळेच त्या उद्योगाच्या क्षेत्रात पुरुषापेक्षा मोठया प्रमाणांत यशस्वी होवू शकतात.
३. ग्रामीण व आदिवासी भागात महिलांनी शेती विषयक नियोजन करुन आधुनिक तंत्राद्वारे शेती उद्योगात भरभराट होवू शकते.
४. लघु व कुटीर उद्योगात महिलांचा सहभाग वाढविण्याकरीता प्रेरणादायी योजना विनासायास राबविणे.
५. महिलांनी मोठया प्रमाणांत उद्योगात सहभाग वाढवण्यासाठी केंद्र सरकार, राज्यसरकार,स्थानिक स्वराज्य संस्था, बॅंका, पतसंस्था यांना शिक्षण प्रशिक्षण व कर्जवि यक धोरण आखून त्याची पूर्णपणे अंमलबजावणी करावी.

## संदर्भ ग्रंथ

१. प्रा. शैलजा सांगळे, ‘महाराष्ट्रातील महिला उद्योजक’
२. उद्योजक, (मासिक) सप्टेंबर २००६
३. एस.बी.पवारश ‘महिलांसाठी स्वयंरोजगाराच्या १०१ वाटा’
४. डॉ. इंदिरा खडसे, ‘गृहव्यवस्थापन आणि गृहकला’
५. ऐ.एम.यू. मुलानी. ‘महिला स्वयंसहाय्यता’ डायमंड पब्लीकेशन
६. ग्रामीण महिला बचत गट www.google.com
७. लोकराज्य मासिक